पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 27/01/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## मध्यरात्रीचा थरार आणि एटीएम चोरी करणारी टोळी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

एटीएम मशीन चोरी करणारी टोळी मागील तीन महीन्यांपासुन नागपूर ग्रामीण, नागपूर शहर, व वर्धा जिल्हयात वारंवार मालवाहु कॅम्पर वाहन चोरून, त्या चोरलेल्या वाहनाचे मदतीने एटीएम मशीनमध्ये असलेल्या पैशांसह, एटीएम मशीन चोरी करण्याच्या घटना करीत होते. अशा प्रकारे या टोळीने, सर्वप्रथम दिनांक 11.10. 2019 रोजी नागपूर ग्रामीण मधील पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील दहेगाव येथुन मालवाहु कॅम्पर गाडी चोरून नेली व दिनांक 13.10.2019 रोजी काटोल येथे बॅक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम मशीन 16,00,000/– नगदी कॅशसह जमीनीतुन उखडुन चोरून नेले. त्यांनतर नमुद टोळीने दिनांक 02.12.2019 रोजी काटोल येथुन, आणखी एक कॅम्पर वाहन चोरून नेले व दिनांक 03.12.2019 रोजी नागपूर–अमरावती मार्गावरील पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीतील बाजारगाव, येथील बॅक ऑफ इंडीयाचे एटीएम मशीन पैशांसह चोरी करण्याचा प्रयत्न करीत असतांना, पोलीसांच्या सतर्कतेमुळे त्यांचा चोरीचा प्रयत्न असफल ठरला. परंतु नमुद आरोपी हे त्यांचे ताब्यातील वाहनाने भरधाव वेगाने पळुन गेल्याने पोलीसांचे हाती लागले नाही. त्यानंतर नमुद टोळीने काटोल येथुन चोरून नेलेल्या याच कॅम्पर वाहनाने दिनांक 06.12.2019 रोजी पाटनसावंगी येथील सूतगीरणी जवळ असलेले ओव्हरसीस बॅकेचे एटीएम मशीनसह 2,83,000/–रू चोरून नेले. त्यानंतर याच टोळीने दिनांक 30.12.2019 रोजी नागपूर–अमरावती रोडवरील वाडी पोलीस स्टेशन हद्दीतील बॅक ऑफ इंडीया चे एटीएम मशीनसह 4,00,000/– चोरून नेले. त्यानंतर याच टोळीने दिनांक 01.01.2020 रोजी सेवाग्राम, जिल्हा वर्धा येथील इंडीकॅश बॅकेचे एटीएम मशीन 12000/– रू सह चोरून नेले. त्यानंर सेलु, जिल्हा वर्धा येथील बॅक ऑफ इंडीया चे एटीएम मशीनसह 6,94,000/–रूपयांसह चोरून नेले. त्यामुळे नमुद टोळीला जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलीसांपुढे होते. वारंवार होणाऱ्या एटीएम चोरीच्या घटनेची गंभीर दखल वरीष्ठ पातळीवरही घेण्यात आल्याने नमुद टोळीला जेरबंद करण्यासाठी पोलीसांवर मोठा दबाव होता. त्याप्रमाणे नागपूर ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जीट्टावार त्यांचे पथकासह अहोरात्र परीश्रम घेत या टोळीच्या मागावर होते.

त्यानंतर एटीएम मशीन चोरी करणा–या याच टोळीने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील दहेगाव येथुन, दिनांक 24.01.2020 रोजी एक पिकअप गाडी चोरून नेली व सदर गाडी पिपळा शिवारात बंद पडल्याने, तेथेच सोडुन पुन्हा त्याच रात्री दहेगाव येथुन वैभव कृषी सेवाकेंद दुकानासमोरून एम एच 40 वाय 3544 ही महींद्र बोलरो पिकअप गाडी चोरून नेली. नमुद टोळीचा नागपूर ग्रमिण गुन्हे शााखा पोलीसांना योग्य प्रकारे अभ्यास झाल्याने, त्यांचेकडुन एटीएम चोरीची घटना होणार याची खात्री झाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांनी नमुद टोळीला जेरबंद करण्याकरीता योग्य नियोजन तयार करून, गुन्हे शाखेचे तीन पथक आरोपीच्या शोधकामी रवाना केले.

त्यानुसार गुन्हे शाखेचे एका पथकातील स्टॉफ हेकॉ चंद्रशेखर घडेकर, चालक नापोशि अमोल कुथे, पोशि रोहन डाखोरे, विपीन गायधने व बालाजी साखरे हे दिनांक 25.01.2020 रोजी रात्री च्या सुमारास गस्त करीत असतांना, त्यांना एम एच 40 वाय 3544 ही महींद्र बोलरो पिकअप गाडी रात्री 03.00 वा चे दरम्यान पाटनसावंगी येथील खापा टी पॉइंटवर पाटनसावंगीकडे जातांना दिसली. नमुद वाहनामध्ये एटीएम चोरीची टोळी असल्याची पोलीसांना खात्री झाल्याने, पोलीसांनी शासकीय वाहनाने नमुद वाहनाचा पाठलाग सुरू केला, असता

आरोपी हे सुसाट वेगाने त्यांचे वाहन पळवु लागले. पोलीस पाटनसावंगी, सावरमेंढा, माउरझरी, फेटरी मार्गे आरोपींचा सतत पाठलाग करीत आले असता, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील कळंबी या गावाजवळ यातील एक आरोपी हा चालत्या वाहनात मागील भागात येवुन पोलीसांच्या दिशेने दगडांचा मारा करू लागला. तसेच पोलीसांची गाडी पंक्चर करण्यासाठी रस्त्यावर आरी, खिळे फेकु लागला. तरीही वाहनचालक अमोल कुथे यांनी अतिशय धाडसाने वाहन चालवुन आरोपीताचे ताब्यातील वाहनाचा पाठलाग सतत सुरूच ठेवला. यातच पोलीसांचे दिशेने दगड फेकणा—या आरोपीने गाडीवरून उडी मारून अंधाराचा फायदा घेवुन पळु लागला. पोलीसांनी पळत जावुन त्यास ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव बहादुर पेहलादराम बावरी वय 30 वर्ष रा. कुलीयाना तालुका परबतसर, जिल्हा नागोर, राजस्थान असे सांगितले. तसेच पोलीसांनी पळत असलेला गाडीचा पाठलाग सतत सुरू ठेवला असता, आरोपीतांनी कळंबी गावाचे शेत शिवारात आपले वाहन लावारीस सोडुन पळ काढला. पोलीसांनी इतर आरोपींचा शोध घेणे सुरू केले असता, वाहनातील इतर आरोपी हे कडंबी व आलेसुर या दोन गावाच्या मध्ये असलेल्या मोठ्या डोंगरावरून वाडीचे दिशेने गेल्याचे समजले. त्याप्रमाणे पोलीसांनी पाच ते सहा किमी डोंगरातुन पाठलाग केला, परंतु आरोपी हे पळुन जाण्यात यशस्वी झाले.

पळून गेलेले इतर आरोपी हे त्यांचे मुळ गावी राजस्थान येथे जाण्यासाठी रेल्वे स्टेशन येथे येतील या अनुमानाच्या आधारे स्थानीक गून्हे शाखेचे दोन पथके हे रेल्वे स्टेशन परीसरात पाठविण्यात आले. तेथे दुपारी 03. 00 वा दरम्यान एका ऑटोतुन तीन इसम उतरले असता त्यांचेवर पोलीसांना संशय आल्याने पोलीसांनी त्यांना विचारपुस केली असता सुरूवातीला त्यांनी आपली खोटी नावे सांगुन पोलीसांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलीसांनी त्यांची अंगझडती घेतली असता एका आरोपीच्या ताब्यातुन एक मास्टर चाबी मिळुन आली. ती चाबी कळंबी येथे गाडी सोडलेल्या ठिकाणी मिळालेल्या चाबीसारखी असल्याने पोलीसांना खात्री झाली कि, हे देखील पकडलेल्या आरोपीचे इतर साथीदार आहेत. पोलीसांनी त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नावे 2. गोपालराम तेजाराम बावरी वय 23 वर्ष रा राहुलीयावास ता डेगाणा जिल्हा नागोर, राजस्थान 3. तुफान हनुमानराम बावरी वय 20 वर्ष रा राहुलीयावास ता डेगाणा जिल्हा नागोर, राजस्थान 4. श्रीनिवास बंतालाल बावरी वय 26 वर्ष रा नांद ता पुष्कर जिल्हा अजमेर राजस्थान असे सांगितले.

अशाप्रकारे चारही आरोपीतांना स्थानीक गुन्हे शाखा कार्यालयात आणुन, त्यांचेकडे गुन्हयासंबधाने सखोल विचारपुस केली असता, त्यांनी दिनांक 26.01.2020 रोजी खापा तहसील सावनेर येथील देना बॅकेचे एटीएम मशीन चोरी करण्याचे उद्देशाने जात असल्याचे सांगीतले. तसेच नमुद आरोपी हे नागपूर शहरातील वाडी पोस्टे हद्दीतील दौलामेटी भागात दोन ठिकाणी कीरायाने रूम घेवुन राहत होते. तसेच वर्धा येथील नागपूर—वर्धा महामार्गावर गावातील शेतातील फार्महाउस किरायाने घेवुन राहत होते. तसेच चोरी केलेले एटीएम मशीन त्या किरायाचे खोलीमध्ये घेवुन जावुन ईलेक्ट्रीक कटरचे सहायाने कापुन त्यातील कॅश काढुन एटीएम मशीन चे तुकडे करून ईतरत्र शिवारात फेकून देत असे.

तसेच नमुद आरोपीतांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याची कबूली दिली.

| अनु. क्र. | पोलीस ठाणे | अप.क्र व कलम |
|---|---|---|
| 1 | पोलीस स्टेशन खापरखेडा | अप क्र 692/2019 कलम 380 भादवि |
| 2 | पोलीस स्टेशन काटोल | अप क्र 749/2019 कलम 457,380 भादवि |
| 3 | पोलीस स्टेशन काटोल | अप क्र 846/2019 कलम 457,380 भादवि |
| 4 | पोलीस स्टेशन कोंढाळी | अप क्र 675/2019 कलम 380,511 भादवि |
| 5 | पोलीस स्टेशन सावनेर | अप क्र 850/2019 कलम 457,380 भादवि |
| 6 | पोलीस स्टेशन वाडी | अप क्र 474/2019 कलम 380,427 भादवि |

| | | |
|---|---|---|
| 7 | पोलीस स्टेशन सेवाग्राम | अप क्र 01/2020 कलम 379 भादवि |
| 8 | पोलीस स्टेशन सेलु | अप क्र 07/2020 कलम 379 भादवि |
| 9 | पोलीस स्टेशन खापरखेडा | अप क्र 30/2020 कलम 379 भादवि |
| 10 | पोलीस स्टेशन खापरखेडा | अप क्र 31/2020 कलम 379 भादवि |

नमुद आरोपीतांविरूध्द राजस्थान तसेच इतरही राज्यात एटीएम मशीन चोरी, वाहन चोरीचे व इतर चारीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात मिळाली आहे.

1. बहादुर पेहलादराम बावरी वय 30 वर्ष रा. कुलीयाना तालुका परबतसर, जिल्हा नागोर, राजस्थान यांचेवर एटीएम मशीन चारीचे 10 गुन्हे व इतर चोरीचे 4 गुन्हे असे एकुण 14 गुन्हे दाखल आहे.
2. गोपालराम तेजाराम बावरी वय 23 वर्ष रा राहुलीयावास ता डेगाणा जिल्हा नागोर, राजस्थान याचेवर चारचाकी वाहनचोरीचे 08 गुन्हे दाखल आहे.
3. श्रीनिवास बंतालाल बावरी वय 26 वर्ष रा नांद ता पुष्कर जिल्हा अजमेर राजस्थान याचेवर एटीएम मशीन चोरीचे 09 गुन्हे व इतर चोरीचे 04 गुन्हे असे एकुण 13 गुन्हे दाखल आहे.

सदर कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा. श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री जितेंद्र वैरागडे, पोउपनि श्री सचिन मत्ते, श्री. नरेन्द्र गौरखेडे, जावेद शेख, यांचे पथकातील सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, बाबा केचे, पोहवा चंद्रशेखर घडेकर, गजेंद्र चौधरी, मदन आसतकर, निलेश बर्वे, सुरज परमार, महेश जाधव , राजेंद्र सनोडिया, नाना राउत, सुनिल मिश्रा, दुर्गाप्रसाद पारडे, पोलीस नायक रामा आडे, दिनेश आधापुरे, शैलेश यादव पोलीस शिपाई रोहन डाखोरे, विपीन गायधने, बालाजी साखरे, राधेश्याम कांबळे, अमोल वाघ, प्रणय बनाफर, सत्यशीर कोठारे, वीरेंद्र नरड, चासफौ/साहेबराव बहाळे, भाउराव खंडाते, चापोना अमोल कुथे, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर